**:: जाहिरात ::**

# मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद

जाहीरात क्र. प्रशासन/१४२०/२०२६, दिनांक १७ /०८/२०२६

मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद आस्थापनेवर "स्वयंपाकी" या पदाकरीता (१७) उमेदवारांची निवड यादी आणि चार उमेदवारांची प्रतिक्षा यादी तयार करण्यासाठी निरोगी, इच्छूक व पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर पदाची वेतनश्रेणी सातव्या वेतन आयोगानुसार वेतन मॅट्रिक्स एस-३ रूपये १६६००-५२४०० अधिक नियमानुसार देय भत्ते अशी राहील.

| पदाचे नाव | एकुण रिक्त पदे | दिव्यांगासाठी राखीव पदे (४%) | निवड यादी | प्रतिक्षा यादी |
|---|---|---|---|---|
| स्वयंपाकी | १८ | ०१ | १७ | ०४ |

(**टीप :-** दिव्यांगासाठी राखीव असलेले पद मुंबई उच्च न्यायालयाने मार्गदर्शक तत्वे तयार केल्यानंतर भविष्यात भरण्यात येईल.)

इच्छुक उमेदवारांनी त्यांचे अर्ज विहीत नमुन्यात (जाहिरातीसोबत परिशिष्ट "अ" प्रमाणे) आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रतींसह दिनांक १० सप्टेंबर, २०२६ रोजी सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत किंवा तत्पुर्वी या कार्यालयात पोहोचतील अशा रितीने फक्त स्पीड पोस्टामार्फत पुढील पत्त्यावर पाठवावेत.

" प्रबंधक (प्रशासन)
मुंबई उच्च न्यायालय,
खंडपीठ औरंगाबाद,
जालना रोड, छत्रपती संभाजीनगर – **४३१००९** "

स्पीड पोस्टाव्यतिरीक्त इतर कोणत्याही माध्यमातुन किंवा वरील नमुद केलेल्या तारखेनंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

**अ) पात्रता :**

१) उमेदवाराचे चारित्र्य आणि वर्तणुक चांगली असावी.

२) उमेदवार किमान इयत्ता चौथी उत्तीर्ण असावा.

३) उमेदवार जाहिरात प्रसिध्दीच्या तारखेला १८ वर्षापेक्षा लहान व ३८ वर्षापेक्षा मोठा नसावा. मागासवर्गीयांसाठी कमाल वयोमर्यादा ४३ वर्षाची असेल. न्यायालयीन कर्मचारी किंवा शासकीय कर्मचारी यांना वयाची अट नाही, तथापि, त्यांनी त्यांच्या कार्यालयामार्फत अर्ज करणे आवश्यक आहे.

४) उमेदवारास मराठी व हिंदी भाषा लिहीता, वाचता व बोलता येणे आवश्यक आहे.

५) मान्यताप्राप्त संस्थेचे "स्वयंपाक अभ्यासक्रम प्रमाणपत्र" असलेल्या उमेदवाराला प्राधान्य दिले जाईल.

६) उमेदवाराकडे स्वयंपाकाचे पुरेसे ज्ञान व त्यासंबधी अनुभव असणे आवश्यक आहे.

७) उमेदवारास सर्व प्रकारचे शाकाहारी तसेच मांसाहारी खाद्यपदार्थ बनवता येणे आवश्यक आहे.

**ब) पात्र उमेदवारांकरीता अटी :**

१) उमेदवार करार करणेस सक्षम असावा.

२) उमेदवाराला नैतिक पतनाच्या गुन्हयासाठी दोषी ठरविण्यात आलेले नसावे किंवा उमेदवाराला कोणतेही न्यायालय/महाराष्ट्र लोकसेवा आयोग/ केंद्रीय लोकसेवा आयोग किंवा राज्य सेवा आयोग यांनी त्यांच्याव्दारे आयोजित केलेल्या परीक्षा निवडीमध्ये उपस्थित राहण्यापासुन कायमचे प्रतिबंधित केलेले नसावे किंवा अपात्र ठरवले नसावे.

३) उमेदवाराला फौजदारी न्यायालयाने दोषी ठरवलेले नसावे किंवा उमेदवाराविरूध्द फौजदारी खटला प्रलंबित नसावा.

४) न्यायालयीन कर्मचारी किंवा शासकीय कर्मचारी यांचेवर कोणतीही विभागीय चौकशी प्रलंबित नसावी.

५) महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ नुसार उमेदवारास अर्ज करण्याच्या दिनांकास २८ मार्च २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक नसावी.

**क) उमेदवारांनी अर्जासोबत खालील दाखल्यांच्या स्वतः प्रमाणित (Self attested) केलेल्या छायांकित प्रती सादर कराव्यात.**

१) शैक्षणिक पात्रता असल्याचे गुणपत्रक आणि प्रमाणपत्र ( उदा. ४थी, ७वी, १०वी, १२ वी आणि पदवी इत्यादी)

२) जन्मतारखेचा दाखला (शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र) अथवा तत्सम अधिकाऱ्याने प्रदान केलेला जन्मतारखेचा पुरावा किंवा जन्म प्रमाणपत्र, एस.एस.सी. चे बोर्ड प्रमाणपत्र.

३) उमेदवार दिव्यांग असल्यास दिव्यांगत्वाचा दाखला.

४) जातीचा दाखला (मागासवर्गीय उमेदवारांसाठी).

५) स्वयंपाकाचा पुर्वानुभव असल्यास संबंधीत हॉटेल/ केटरींग व्यावसायिकाने दिलेला दाखला. ( उमेदवाराकडे अनुभव असल्यास, संबंधित नियोक्त्याने दिलेल्या अनुभव प्रमाणपत्रामध्ये उमेदवारांचे नाव, अचुक पदनाम, वेतनश्रेणी /वेतन, सेवाकालावधी ( दिनांकासह “पासुन-पर्यंत”), संबंधित संस्थेमधील एकुण कार्यकाल, प्रमाणपत्र जारी करण्याचा दिनांक, सक्षम प्राधिकाऱ्याची स्वाक्षरी संस्थेच्या शिक्क्यासह असणे आवश्यक आहे. स्वयंपाक अभ्यासक्रमात मान्यताप्राप्त संस्थेद्वारे जारी करण्यात आलेले प्रमाणपत्र. अनुभवाच्या पुराव्यासाठी सादर करण्यात आलेले नियुक्तीपत्र (Appointment Letter), ऑफर लेटर (Offer Letter) अथवा वेतन पावती (Pay Slip) ग्राहय धरली जाणार नाही.

६) विशेष पाककृती संबंधी प्राविण्याबाबतचा दाखला (असल्यास)

७) महाराष्ट्राचे अधिवास प्रमाण (Domicile Certificate)

८) विवाहित महिला उमेदवाराच्या बाबतीत, जर उमेदवाराने नाव बदलले असल्यास नाव बदलाबाबतचे दस्तऐवज उदा. शासकीय राजपत्र किंवा सक्षम प्राधिकरणाने जारी केलेल्या विवाह प्रमाणपत्राची प्रत इत्यादी.

९) सेवायोजन कार्यालयात नोंदणी केली असल्यास, नोंदणी प्रमाणपत्राची प्रत.

१०) विशेष अर्हता असल्याबाबतचा दाखला.

१ १) आधार कार्डची प्रत.

१ २) न्यायालय प्रशासनाने विचारल्यास इतर दस्तऐवज.

## ड) उमेदवारांनी अर्जासोबत खालील मूळ दाखले / कागदपत्रे जोडावीत

१) जाहिरात प्रसिध्दीनंतरची तारीख असलेले, दोन प्रतिष्ठीत व्यक्तींनी दिलेले चारित्र्य संपन्नतेविषयीचे दोन प्रमाणपत्र (जाहिरातीसोबत परिशिष्ट - "ब"नमुन्यात). 'प्रतिष्ठीत व्यक्ती' म्हणजे ज्यांच्याविरुध्द कोणतीही फौजदारी कार्यवाही प्रलंबित नाही, ज्यांना यापूर्वी कोणत्याही गुन्ह्यात दोषी ठरविण्यात आलेले नाही, तसेच नैतिक अध:पतनाच्या (Moral Turpitude) कारणास्तव ज्यांची सेवा समाप्त किंवा निलंबित करण्यात आलेली नाही अशा व्यक्ती. सदर प्रमाणपत्रांमध्ये प्रमाणपत्र देणाऱ्या व्यक्तींचे नाव, संपूर्ण पत्ता व संपर्क क्रमांक नमूद असणे आवश्यक आहे.

२) लहान कुटुंबाबाबत प्रतिज्ञापन (जाहिरातीसोबत नमुना 'अ' प्रमाणे)

३) उमेदवार शासकीय कर्मचारी असल्यास सक्षम प्राधिकाऱ्यांची (कार्यालयाची) मंजुरी घेतल्याचे ना-हरकत प्रमाणपत्र आवश्यक राहील.

४) अर्जासोबत स्वत:चा पत्ता ठळक अक्षरात लिहिलेले पाच रुपयाचे पोस्टाचे तिकीट लावलेले कोरे पाकीट पाठवावे.

५) पासपोर्ट आकाराचा स्वत:चा एक फोटो सोबत पाठवावा.

६) उमेदवाराने त्याला बनवता येणाऱ्या खाद्यपदार्थांची यादी अर्जासोबत जोडावी.

**इ) उमेदवारांकरिता इतर आवश्यक सूचना :**

१) अर्ज पाठवताना पाकिटावर **"स्वयंपाकी या पदाकरिता अर्ज"** असे ठळक अक्षरात लिहावे. तसेच एकापेक्षा अधिक अर्ज सादर केल्यास, त्याचा / तिचा केवळ शेवटचा सादर केलेला अर्जच विचारात घेण्यात येईल. या संदर्भात कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

२) अर्जातील विहित जागी उमेदवाराने स्वत:चे अलीकडील काळातील पासपोर्ट आकाराचे रंगीत छायाचित्र (कलर फोटो) चिकटवावे.

३) स्वयंपाकी पदासाठी इयत्ता चौथी मधील गुण नमूद करणे अनिवार्य असेल. जर उमेदवार इयत्ता चौथी परिक्षा उत्तीर्ण असेल आणि पुढील उच्च अर्हता प्राप्त उदा. १० वी/१२ वी/पदवी असेल व त्याच्याकडे/तिच्याकडे इयत्ता चौथी चे गुणपत्रक नसेल तर त्याने/तिने अर्ज भरताना इयत्ता चौथी करिता काल्पनिकरित्या ५०% गुणांची (उदा. एकूण १०० पैकी ५० गुण प्राप्त) नोंद अर्जामध्ये शैक्षणिक अर्हता रकान्यात करावी.

४) उमेदवाराने माहिती भरताना संपूर्ण नाव (Spelling) त्यांच्याजवळ उपलब्ध असलेल्या शैक्षणिक कागदपत्रानुसार अचूक नमूद करावे तसेच शैक्षणिक पात्रतेबाबत माहिती खाली दिलेल्या क्रमानुसार नमूद करावी

१. ४ थी
२. ७ वी
३. एस.एस.सी. (S.S.C.)
४. एच.एस.सी. (H.S.C.)
५. पदवी इत्यादी

५) काही शाळांच्या गुणपत्रिका टक्केवारीऐवजी ग्रेडच्या स्वरुपात दिल्या जातात. या प्रकरणात, उमेदवारांनी अर्ज भरण्यापूर्वी विषयनिहाय मिळालेले गुण, एकुण गुण आणि टक्केवारी असलेले गुणपत्रक संबंधीत शाळेकडून मिळवावे आणि ते गुण उपरोक्त रकान्यात दिलेल्या सूचनांनुसार भरावे. सदर गुणपत्रक अर्जासोबत पाठवावे.

६) ज्या उमेदवाराकडे कुकींग मधील पदवी, पदविका अभ्यासक्रम पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र अथवा पंचतारांकित/त्रितारांकित हॉटेलमध्ये शेफ/स्वयंपाकी म्हणून काम करण्याचा अथवा एखाद्या मान्यताप्राप्त संस्थेकडे स्वयंपाकी म्हणून काम केल्याचा/करीत असल्याचा दोन किंवा दोन पेक्षा जास्त वर्षाचा अनुभव असलेल्यांना प्राधान्य दिले जाईल.

(७) उमेदवाराविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल/ प्रलंबित असल्यास किंवा पुर्वी एखाद्या प्रकरणात फौजदारी न्यायालयाने शिक्षा ठोठावली असल्यास त्याबाबत सविस्तर माहिती भरावी. तसेच न्यायालयीन कर्मचारी किंवा शासकीय कर्मचारी यांच्यावर कोणतीही विभागीय चौकशी प्रलंबित असल्यास त्याबाबत सविस्तर माहिती भरावी.

८) अपुर्ण/चुकीची माहिती असलेला अर्ज नाकारला जाईल. निवड प्रकिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात दिलेली माहिती खोटी असल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रदद करण्यात येईल. अथवा नियुक्ती झाल्यास त्याला / तिला पदावरुन काढून टाकण्यात येईल.

९) जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या अर्जाच्या संख्येनुसार व उमेदवारांच्या शैक्षणिक पात्रता व त्यातील गुणवत्तेनुसार तसेच स्वयंपाकी कामाच्या अनुभवानुसार उमेदवारांची अल्पसूची (Shortlisting) प्रसिध्द करण्यात येईल. अल्पसूची (Shortlisting) करण्याचे सर्वाधिकार मा. निवड समिती, मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद, यांनी आपल्याकडे राखून ठेवले आहेत.

१०) अर्ज भरताना कोणतेही शुल्क भरण्याची आवश्यकता नाही. तथापि, अल्पसूची प्रसिध्द केल्यानंतर त्यात समाविष्ट असलेल्या उमेदवारांनीच (Shortlisted Candidate) तद्नंतर “Registrar High Court Bench at Aurangabad” यांचे नावे राष्ट्रीयकृत बँकेतून रुपये २००/-(दोनशे रुपये) चा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) अथवा पोस्टल ऑर्डर काढावी लागेल.

सदरील शुल्क ना-परतावा राहील.

११) अल्पसूचीत समाविष्ट उमेदवार (Shortlisted candidate) जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या पात्रता व अटी शर्तीनुसार पात्र असल्याचे समजून त्यास प्रात्यक्षिक परीक्षेकरिता तात्पुरता प्रवेश देण्यात येईल.

१२) प्राप्त अर्जांची छाननी केल्यानंतर अल्पसूचीप्रमाणे पात्र उमेदवारांना खालील निवड प्रक्रियेस सामोरे जावे लागेल.

| अ.क्र. | मुल्यांकन पध्दती | गुण |
|---|---|---|
| १ | स्वयंपाकाची प्रात्यक्षिक परीक्षा<br>(उत्तीर्ण गुण किमान १५) | ३० |
| २ | शारीरीक कार्यक्षमता चाचणी | १० |
| ३ | तोंडी मुलाखत | १० |
| **४** | निवड प्रकियेचे एकूण गुण | **५०** |

१३) वरील सर्व परिक्षांसाठीचे वेळापत्रक मुंबई उच्च न्यायालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल.

१४) स्वयंपाकाच्या प्रात्यक्षिक परीक्षेकरिता येताना उमेदवारांनी वर उल्लेखीत करण्यात आलेला रूपये २००/- चा मूळ धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) किंवा पोस्टल ऑर्डर सोबत घेऊन येणे बंधनकारक आहे.

१५) पात्र उमेदवारांना स्वयंपाक प्रात्यक्षिक परीक्षा, शारीरिक कार्यक्षमता चाचणी, तोंडी मुलाखतीसाठी नेमलेल्या तारखांना स्वखर्चाने हजर रहावे लागेल.

१६) परिक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेश प्रमाणपत्र आणि पडताळणीसाठी स्वत:चे आधारकार्ड/ पॅनकार्ड/ वाहन परवाना/ मतदार ओळखपत्र इ. ओळखपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

१७) स्वयंपाकाच्या प्रात्यक्षिक परीक्षेत अनुत्तीर्ण झाल्यास उमेदवार उर्वरित चाचणीसाठी पात्र राहणार नाही.

१८) केवळ अर्ज दाखल केला यावरून मुलाखतीचा किंवा नेमणुकीचा हक्क मागता येणार नाही.

१९) मुलाखती/नियुक्ती पुर्वी उमेदवाराची जाहिरातीनुसार पात्रता तपासण्यात येईल. त्यावेळी उमेदवार अपात्र आढळल्यास त्याची नियुक्ती करण्यात येणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील.

२०) मुलाखतीसाठी बोलावण्यात येणाऱ्या उमेदवारांनी अर्जासोबत दाखल केलेल्या कागदपत्रांच्या मूळ प्रती पडताळणीसाठी आणाव्यात तसेच, या कार्यालयास मान्य होईल असे स्वतःचे फोटो असलेला ओळखीचा पुरावा जसे की, मतदार ओळखपत्र, पॅन कार्ड, आधार कार्ड, वाहनचालक परवाना यापैकी कोणताही एक मूळ पुरावा आणावा.

२१) उमेदवारांची निवड ही स्वयंपाकाची प्रात्यक्षिक परीक्षा, शारीरिक कार्यक्षमता चाचणी व तोंडी मुलाखतीत मिळालेल्या गुणांच्या आधारे केली जाईल.

२२) उमेदवारांची प्रात्यक्षिक परीक्षा, शारीरिक कार्यक्षमता चाचणी व तोंडी मुलाखतीत मिळवलेल्या गुणांच्या आधारे वरील पदासाठी गुणवत्ताक्रमानुसार निवड यादी व प्रतीक्षा यादी तयार करण्यात येईल. निवड प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर योग्य वेळी सदर निवड यादी व प्रतीक्षा यादी मुंबई उच्च न्यायालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

२३) निवड यादी व प्रतीक्षा यादी या मुंबई उच्च न्यायालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध झालेल्या दिनांकापासून दोन (२) वर्षांच्या कालावधीपर्यंत वैध राहतील. त्यानंतर सदर यादींची वैधता संपुष्टात येईल.

२४) निवड झालेल्या उमेदवारांची नियुक्ती ही उच्च न्यायालयामार्फत करण्यात येणाऱ्या उमेदवाराच्या वैद्यकीय तपासणी आणि संबंधीत पोलीस स्टेशनकडून चारित्र्य पडताळणीच्या अहवालांवर अवलंबून असेल.

२५) निवड यादीतील उमेदवार नियुक्ती आदेशात नमूद केलेल्या कालावधीत सेवेत रूजू होऊ शकला नाही तर त्याचे नाव निवड यादीतून कमी केले जाईल.

२६) निवड यादीतील उमेदवारांची नियुक्ती सुरूवातीला दोन वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी असेल. परिविक्षाधीन कालावधी समाधानकारक पूर्ण झाल्याचे घोषित करेपर्यंत नियुक्तीच्या सेवा कोणत्याही वेळी, कोणतीही पूर्वसूचना/नोटीस न देता किंवा कोणतेही कारण न देता समाप्त केली जाईल.

२७) निवड यादीतील उमेदवार रुजू न झाल्यास किंवा निवड यादीतील उमेदवाराने पद स्विकारल्यानंतर त्या यादीच्या वैधतेच्या कालावधीत राजीनामा दिल्यास, जर त्यावेळेस निवड यादी संपली असेल, तरच प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचा त्यांच्या क्रमानुसार विचार करण्यात येईल.

२८) उमेदवाराने निवड समितीच्या सदस्यांना किंवा उच्च न्यायालयात काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना / कर्मचाऱ्यांना भेटण्याचा किंवा त्यांच्यावर निवड प्रक्रियेसंबंधी व्यक्तीशः अथवा इतर कोणा मार्फत दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्याला / तिला निवड प्रक्रियेमधून अपात्र ठरविण्यात येईल. यासंबंधी निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

२९) या निवड प्रक्रीयेत मा. निवड समितीने घेतलेला निर्णय अंतिम असेल.

३०) याद्वारे सुचित करण्यात येते की, निवड प्रक्रीयेमध्ये कोणत्याही टप्प्यावर आवश्यक ते बदल करण्याचा सर्वाधिकार उच्च न्यायालयाच्या अधीन राहील.

३१) सूचनांनुसार नसलेले अथवा अपूर्ण आढळणारे अर्ज कोणतीही पुढील कार्यवाही न करता सरसकट नाकारण्यात येतील.

३२) निवड झालेल्या उमेदवारांनी पदस्थापनेबाबत/स्थळाबाबत कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास किंवा पदस्थापनेबाबत विनंती केल्यास त्याची निवड रद्द करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

३३) नियुक्त उमेदवारास माननीय न्यायमुर्ती यांच्या निवासस्थानी तसेच न्यायालयीन इमारतीत सदर पदासाठी आवश्यक असणारी सर्व प्रकारची कामे करावी लागतील

३४) कार्यालयाच्या नियंत्रणाबाहेरील कोणत्याही अनपेक्षीत घटनेमुळे भरती प्रक्रियेचे वेळापत्रक बदलू शकते, तसा बदल वेळोवेळी उच्च न्यायालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द केला जाईल. त्याकरिता उमेदवारांनी अधिकृत संकेतस्थळ https://bombayhighcourt.gov.in ला आठवडयातुन किमान एक वेळेस भेट द्यावी.

३५) कोणत्याही बदलाबाबतची सूचना उशिरा मिळाल्याने नियोजित तारखेस व वेळेस उमेदवार स्वयंपाकाची प्रात्यक्षिक परीक्षा, शारीरिक कार्यक्षमता चाचणी व तोंडी मुलाखतीस अनुपस्थित राहिल्यास उच्च न्यायालय प्रशासनाकडून याबाबत कोणतीही तक्रार/दावा विचारात घेतला जाणार नाही.

३६) रिक्त पदांची संख्या ही अंदाजित असून, कोणत्याही प्रशासकीय कारणास्तव त्यात वाढ अथवा घट करण्याचा अधिकार राखून ठेवण्यात आलेला आहे.

३७) भरती रद्द झाल्यास याबाबत उमेदवाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. परीक्षेचा प्रकार, परीक्षा स्थगित करणे व रद्द करणे, अंशतः बदल करणे, याबाबत सर्व अधिकार माननीय निवड समिती, मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद, यांनी स्वतःकडे राखून ठेवले आहेत. याबाबतीत कोणताही दावा विचारात घेतला जाणार नाही.

स्वाक्षरीत/-

प्रबंधक (प्रशासन)
मुंबई उच्च न्यायालय
खंडपीठ औरंगाबाद

दिनांक : १७/०८/२०२६